महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

# गायी-म्हशीतील माजाची लक्षणे





गायी-म्हशीतील माज लगेच ओळखता आला तर योग्य वेळी रेतन करता येते. भाकडकाळ आणि दोन वेतातील अंतर कमी राखता येते. गायी-म्हशीपासून अधिक वासरे आणि ओघानेच अधिक दूध उत्पादन मिळविता येते. याकरीता पशुपालकांचे गायी-म्हशींच्या माजाच्या लक्षणाकडे बारकाईने लक्ष असावे.

## माजाची लक्षणे कोणती ?

१. दूध उत्पादन कमी होणे.
२. अस्वस्थ असणे.
३. खाण्या-पिण्याकडे लक्ष नसणे.
४. अवेळी पान्हा सोडणे.
५. सतत हंबरणे.
६. शेपटी वर करणे.
७. वारंवार शेपटीकडे वळून पाहणे.
८. वारंवार लघवी करणे.
९. योनीवर सुज येणे.
१०. योनीची श्लेष्मल त्वचा चमकदार गुलाबी होणे.
११. दुसऱ्या जनावरांवर उडणे किंवा दुसरे जनावर उडत असल्यास शांत राहणे.
१२. वळुच्या सानिध्यात राहण्याचा प्रयत्न करणे.
१३. योनी मार्गातून स्वच्छ चिकट पारदर्शक चकचकीत स्त्राव (बळस) येणे.
१४. स्त्राव मांडीस, शेपटीखालील भागास चिकटलेला असणे.

## याकडे लक्ष द्या.....

१. माजाकरीता सकाळी व सायंकाळी निरिक्षण करा.
२. माजाच्या लक्षणांची सुरूवात झाल्यापासून गायीमध्ये १२ ते १८ तासांदरम्यान व म्हशीमध्ये २० ते ३० तासांदरम्यान कृत्रिम रेतन करा.
३. कृत्रिम रेतन केल्यानंतर पुढील २१, ४२ व ६३ व्या दिवशी माजाकडे लक्ष द्या.
४. कृत्रिम रेतनानंतर ३ महिन्यांनी पशुवैद्यकाकडून गर्भधारणेची खात्री करा.
५. म्हशीमध्ये मुक्यामाजाचे प्रमाण अधिक असते, तेव्हा माजाच्या लक्षणाकरीता म्हशींचे बारकाईने निरीक्षण करावे.

**म्हशीत सव्वा वर्षाला पारडू, गायीत वर्षाला वासरू।**
**भरघोस उत्पादनासाठी, असा ठाम संकल्प करू।।**

पशुविज्ञान व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग, प.वै.म., उदगीर